"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/वसं/1674/2022-23. दिनांक: 10/08/2022.

प्रति,

जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने),
सिडको भवन, सी. बी.डी बेलापुर,
नवी मुंबई 400 614.

विषयः- **वन जमिन रायगड**

वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत सागर तटीय रोड जलमार्ग सेक्टर 16 ते सेक्टर 11, सी.बी.डी.बेलापूर ते जलवाहतुक टर्मिनल नेरुळ नवी मुंबई...सिडको नवी मुंबई यांचा प्रस्ताव.. क्षेत्र- 7.5235 हेक्टर

संदर्भः- 1) जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने) सिडको भवन, सी. बी.डी बेलापुर यांचेकडील पत्र क्र. सिडको/जीएम(फॉरेस्ट)/2022/1575, दिनांक 26/04/2022.

2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/768, दिनांक 27/05/2022.

3) जनरल मॅनेजर (वने) सिडको भवन, सी. बी.डी बेलापुर यांचेकडील पत्र दिनांक 20/07/2022

3) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/1699, दिनांक 03/08/2022

उपरोक्त संदर्भित पत्र क्र.3 अन्वये जल मार्ग सेक्टर 16 ते सेक्टर 11, सी.बी.डी. बेलापूर ते जलवाहतुक टर्मिनल नेरुळ नवी मुंबई या सागर तटीय रस्त्यासाठी वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत वन जमिन मागणी प्रस्तावात संदर्भित पत्र क्र. 2 चे अनुषगाने त्रृटीची पुर्तता करून या कार्यालयास 1 प्रतीत सादर केला आहे. सदर प्रस्तावांची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1. प्रस्तुत प्रस्तावामध्ये मौजे खारघर ता. पनवेल येथील 5.7984 हेक्टर मॅग्रोव्ह क्षेत्राचा समावेश करून वनजमीन मागणी प्रस्ताव सादर केला आहे. परंतु प्रस्तावातील क्षेत्राची MRSAC कडील नकाशे व सदयस्थितीत Google earth Image वरून पडताळणी केली असता स.नं. 4 पैकी, 149, 227, NM4 व क्रीक लगत चे कांदळवन 0.6187 हे. क्षेत्र प्रस्तावात बाधीत होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच सदर क्षेत्राचा समावेश प्रस्तावात केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर क्षेत्राचा प्रस्तावात समावेश करणे आवश्यक आहे.
2. सदर प्रस्तावात मागणी क्षेत्रात बदल होत असल्याने ऑनलाईन प्रणालीवर सुधारणा करणे आवश्यक आहे.

3. तसेच 1:50000 या प्रमाणातील नकाशावर आखणी मार्गापासून नजीकचे कर्नाळा अभयारण्याचे पर्यावरण संवेदनशील (ESZ) क्षेत्राचे अंतर दर्शविलेले आहे. तथापी आखणी मार्गापासून कर्नाळा अभयारण्याचे अंतर दर्शविलेले नाही. ते दर्शविणे आवश्यक आहे.

4. तरी सदर प्रस्तावांत बाधीत होणा-या वनक्षेत्राचे 7/12 उतारे आंग्ल भाषेतील भाषांतरीत करून प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

5. प्रस्तावात जिल्हाधिकारी यांचेकडील वनहक्क कायदा, 2006 अंतर्गत प्रमाणपत्र सामिल असणे आवश्यक आहे.

6. प्रस्तावांत वळते होणारे क्षेत्र हे 1.00 हेक्टर पेक्षा जास्त असल्याने, प्रकल्पांत बाधीत होणार वनक्षेत्रांचे बदल्यांत तितकीच पर्यायी वनेत्तर जमिन उपलब्ध करुन देऊन त्याबाबतची माहिती/नकाशे प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

7. सदर प्रस्तावांत बाधीत होणारे क्षेत्राचे बदल्यांत द्यावाचे पर्यायी वनेत्तर क्षेत्र निश्चित झाले शिवाय व त्याची माहिती प्रस्तावांत व ऑनलाईन प्रणालीवर दाखल केले शिवाय प्रस्ताव वरीष्ठांमार्फत केंद्रशासनास मंजूरी करीता सादर करणे शक्य होणार नाही याची नोंद घ्यावी.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव आवश्यकत्या दस्तऐवजासह आठ प्रती या कार्यालयास सादर करणेत यावा.

(आशिष ठाकरे, भा.व.से)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल व वन परिक्षेत्र अधिकारी, पनवेल यांना माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी.

2/- सदर प्रस्तावात वन परिक्षेत्र अधिकारी, पनवेल यांनी मोका पहाणी करून बाधीत होणारे वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे अगर कसे याबाबत खात्री करुन जर वृक्षतोड होणार असेल तर बाधीत होणारे वृक्षांचे यादीसह वृक्षतोडीचे अंदाजपत्रक विहीत प्रपत्रात आंग्ल भाषेत भाषांतरीत करून आठ प्रती अंदाजपत्रक या कार्यालयास सादर करावा.

प्रतः वनक्षेत्र सर्व्हेक्षक, विभागीय कार्यालय, अलिबाग यांना माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.